# सवित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता चाचणी
## रविवार दि. ६ सप्टेंबर, २०१५

परीक्षेची वेळ :— पहिले सत्र (पेपर १) — सकाळी १०.०० ते दुपारी ११.१५
(पेपर २) — सकाळी ११.१५ ते दुपारी १२.३०
दुसरे सत्र (पेपर ३) — दुपारी २.०० ते दुपारी ४.३०

---

**विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसंदर्भातील सूचना :**

१. परीक्षा सुरू होण्यापूर्वी ३० मिनिटे अगोदर परीक्षा कक्ष खुले केले जातील. परीक्षा सुरू झाल्यावर २० मिनिटानंतर उशिरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

२. आसनक्रमांका सहीत बैठक व्यवस्था प्रत्येक विद्यार्थ्याला उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी आसन क्रमांक तपासूनच आपल्या आसन क्रमांकाप्रमाणे परीक्षेसाठी बसावयाचे आहे.

३. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या बुकलेटचे सील पहिल्या सत्रात सकाळी १०.०० वाजण्यापूर्वी व दुसऱ्या सत्रात दुपारी २.०० वाजण्यापूर्वी उघडता येणार नाही.

४. परीक्षेच्या पहिल्या सत्रात सकाळी १२.०० वाजेपर्यंत आणि दुसऱ्या सत्रात दुपारी ३.३० वाजेपर्यंत कोणत्याही विद्यार्थ्याला परीक्षा कक्षा बाहेर जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही. तसेच प्रत्येक सत्राच्या शेवटच्या २० मिनिटांमध्ये कोणत्याही विद्यार्थ्यास स्वच्छतागृहामध्ये जाता येणार नाही.

५. उत्तरपत्रिका सोडविण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका संच (Test Booklet) आणि ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेमध्ये दर्शविलेल्या ठिकाणी विद्यार्थ्याने त्याचा <u>आसन क्रमांक</u> लिहिणे आवश्यक आहे. तसेच त्यामध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचना व्यवस्थितरीत्या वाचून घेणे आवश्यक आहे. तसेच देण्यात आलेले प्रश्नपत्रिका संच आणि ओ.एम.आर. उत्तरपत्रिका हे बरोबर असल्याची (उदा. पृष्ठ क्रमांक, प्रश्नांचा अनुक्रमांक, विषय सांकेतांक क्रमांक आणि विद्यार्थ्याने निवडलेला विषय) खात्री करून घ्यावी. जर प्रश्नपत्रिका संच आणि ओ.एम.आर. उत्तरपत्रिका यामध्ये काही बदल असल्यास, त्याऐवजी दुसरी योग्य अशी उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडून बदलून घ्यावी.

६. कोणत्याही विद्यार्थी/विद्यार्थिनीने आपला भ्रमणध्वनी क्रमांक किंवा इतर कोणत्याही ओळखीसंबंधीची खुण ओ.एम.आर. शीटवर नमूद केल्यास, सदर विद्यार्थी/विद्यार्थिनी यांना सदर परीक्षेसाठी गैरमार्गाचा अवलंब करण्याच्या नियमानुसार अपात्र ठरविण्यात येईल.

७. प्रत्येक विद्यार्थ्याने आपला बॉल पेन, इंक पेन, खोड रबर, पेन्सिल व इंक इत्यादी वस्तू आणणे आवश्यक आहे. परीक्षेदरम्यान कॅलक्युलेटर व लॉग टेबल इत्यादी वापरण्याची परवानगी नाही. तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणे उदा. सेल्युलर, मोबाईल, सॅटेलाईट फोन, पेजर इत्यादी परीक्षा हॉलमध्ये नेण्यास मनाई आहे.

८. प्रत्येक पेपर सोडविण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये, ओ.एम.आर. शीटमधील माहिती भरण्यासाठीची वेळ समाविष्ट आहे. ओ.एम.आर. शीटवरील माहिती भरण्यासाठी वेगळा वेळ दिला जाणार नाही.

९. परीक्षेसंबंधी सूचना देणाऱ्या बेलचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील:—
   १. परीक्षा सुरू होण्यापूर्वी ३० मिनिटे.
   २. परीक्षा सुरू होताना.
   ३. पेपर पहिला, दुसरा व तिसरा संपण्यापूर्वी १५ मिनिटे.
   ४. प्रत्येक पेपर समाप्तीच्या वेळी.

१०. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी परीक्षा कक्षाबाहेर जाताना पेपर १, २, ३ च्या मुळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे सूपूर्द करणे आवश्यक आहे. तथापि विद्यार्थ्यांनी वापरलेले तिन्ही पेपरचे प्रश्नपत्रिका संच व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची कार्बन विरहीत कॉपी (Carbonless copy) विद्यार्थी घेऊन जाऊ शकतात.

११. परीक्षा कक्षामध्ये विद्यार्थ्यांनी धुम्रपान, चहा व इतर खाद्यपदार्थांचे सेवन करू नये.

१२. कोणत्याही विद्यार्थ्याने परीक्षेच्या वेळी कॉपी किंवा इतर कोणत्याही गैरमार्गाचा वापर केल्यास, त्यास पुढील सेट परीक्षेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

१३. विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षेचा फॉर्म भरल्यानंतर सेट परीक्षेसाठी निवडलेला विषय बदलता येणार नाही.

१४. पर्यवेक्षक, अधिक्षक, निरीक्षक यांनी मागणी केल्यास प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र दाखवणे आवश्यक आहे.

१५. अधिक्षक/पर्यवेक्षकांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन विद्यार्थ्यांनी करणे बंधनकारक आहे.

१६. अंध विद्यार्थ्यांसाठी पेपर १ व २ साठी स्वतंत्रपणे अधिकचा ३० मिनिटे वेळ देण्यात येईल, तर पेपर ३ साठी ४५ मिनिटे अधिक देण्यात येईल. तसेच अशा विद्यार्थ्यांना

१७. सदर परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना टी.ए./डी.ए. दिला जाणार नाही.

# महत्वाच्या सूचना

१. जे विद्यार्थी पेपर—१ ला अनुपस्थित राहतील त्यांना पेपर २ व ३ साठी उपस्थित राहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

२. **पेपर १** : प्रश्नपत्रिका संचात दिलेल्या प्रत्येकी दोन गुणांच्या एकूण ६० बहु पर्यायी प्रश्नांपैकी ५० प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. जर विद्यार्थ्यांनी ५० प्रश्नांपेक्षा अधिक प्रश्न सोडविले असतील, तर पहिले ५० प्रश्नच तपासण्यात येतील.

३. पेपर १, २ व ३ मध्ये चुकीच्या उत्तरांसाठी गुणकपात (Negative Marking )केली जाणार नाही.

४. विद्यार्थ्यांने प्रश्नपत्रिकेतील प्रश्न प्रवेशपत्र किंवा इतरत्र उतरवून घेतल्यास, त्यास गैरमार्गाचा अवलंब केल्यामुळे परीक्षेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

५. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागाकडून विद्यार्थ्यांना उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक दिले जाणार नाहीत. तसेच या परीक्षेचे पुनर्मुल्यांकन देखील करता येणार नाही.

६. विद्यापीठाकडून जाहीर केलेला निकाल हा तात्पुरता (Provisional) समजण्यात येईल. सेट परीक्षेसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व अटींची पूर्तता झाल्यानंतरच उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा निकाल अंतिम करून संबंधित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे अदा करण्यात येतील.

७. पेपर २ मध्ये विद्यार्थ्यांने निवडलेल्या विषयातील ५० बहुपर्यायी प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्न सोडविणे आवश्यक असून प्रत्येक प्रश्नास २ गुण असणार आहेत.

८. पेपर ३ मध्ये विद्यार्थ्यांने निवडलेल्या विषयातील ७५ बहुपर्यायी प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्न सोडविणे आवश्यक असून प्रत्येक प्रश्नास २ गुण असणार आहेत.

९. दिनांक ६ सप्टेंबर, २०१५ रोजी होणाऱ्या सेट परीक्षेचा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घेता येईल.

१०. विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या परीक्षेसंदर्भातील अधिकच्या माहितीसाठी (उदा. नोंदणी, परीक्षेचे ठिकाण, आसन व्यवस्था इत्यादी) उपरोक्त नमूद संकेतस्थळावरून माहिती करून घेणे आवश्यक आहे. तसेच अधिकच्या माहितीसाठी सेट परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ स्टेट एजन्सी कार्यालयाशी संपर्क साधावा.

११. जर इंग्रजी किंवा हिंदी भाषेच्या भाषांतरामध्ये काही तफावत असल्यास, इंग्रजी भाषेतील मजकूर/अर्थ ग्राह्य धरण्यात येईल.

१२. प्रवेशपत्राची द्वितीय प्रत विद्यापीठामार्फत उपलब्ध करून दिली जाणार नाही.

# महत्वाच्या सूचना

- ओ.एम.आर. उत्तरपत्रिका (OMR Answer sheet) या प्रश्नपत्रिकेच्या आत पेपरच्या सीलद्वारे बंद करून ठेवलेल्या असतात. सदरचे सील परीक्षा सुरू होण्यापूर्वी तोडू नये/उघडू नये.

- मूळ ओ.एम.आर उत्तरपत्रिकेची घडी घालू नये अथवा कोणत्याही प्रकारे ती खराब होईल या दृष्टिने फाडू नये अथवा कापू नये अन्यथा ती मुल्यांकनासाठी वापरता येणार नाही.

- पेपर—१, पेपर—२ व पेपर—३ च्या सर्व ओ.एम.आर. उत्तरपत्रिका या मुल्यांकनाच्या दृष्टिने विशिष्टरीत्या तयार केलेल्या असतात. त्यामधील माहिती ही पूर्णतः भरणे तसेच त्यासाठी आवश्यक त्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे अन्यथा अशा ओ.एम.आर. उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन केले जाणार नाही. सदरच्या कारणास्तव जर कांही विद्यार्थ्याचे निकाला संबंधीचे नूकसान झाल्यास त्यास विद्यार्थी जबाबदार राहील.

- प्रत्येक प्रश्नासाठी A,B,C,D या प्रमाणे चार पर्याय उत्तरासाठी दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायामधून बरोबर असलेले गोल काळे करावेत.

  उदा. A, B, C, D पैकी जेथे B उत्तर बरोबर असेल

  o o o o

  चूकीचे गोल काळे करणे      गोल बरोबर काळे करणे

  o o      o

- सर्व नोंदी या दिलेल्या जागेतच मर्यादित ठेवण्यात याव्यात. विद्यार्थ्यांने योग्य तो गोल काळया/निळया बॉल पॉइंट पेनने स्पष्टपणे गोल करावे.

- ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेवर दुरूस्तीसाठी पांढरी शाई (White fluid ink) वापरण्यास परवानगी नाही.

- केवळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेवरच उत्तरे द्यावीत. ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेच्या व्यतिरीक्त इतर ठिकाणी (o गोल) केल्यास ओ.एम.आर. उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही. विद्यार्थ्यांनी पूर्ण विचाराअंती ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेवर उत्तरे द्यावीत. एकदा उत्तर दिल्यानंतर त्यामध्ये बदल करण्यास परवानगी दिली जाणार नाही. एकापेक्षा अधिक उत्तरे देण्याची परवानगी नाही.

*****